.nagpur

# NMC e NEWS LETTER

जुलै २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात

### स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत चार हजार नवीन घरे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी एक हजार घरे बांधणार

**२०१ कोटीच्या कामांसाठी संचालक मंडळाची मंजुरी**

नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत चार हजार नवीन घरे बांधण्याच्या कामाला नागपूर स्मार्ट सिटीच्या संचालक मंडळाने मंजुरी दिली. गुरूवारी (ता.१९) ला मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीत प्रधान सचिव प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेत संचालक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली.

स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत चार हजार नवीन घरे बांधण्यात येणार आहे. चार हजार पैकी तीन हजार घरे हे पीपीपी तत्त्वावर बांधण्यात येणार असून एक हजार घरे हे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी बांधण्यात येणार आहेत. एक हजार घरे हे नागपूर स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट कॉरपोरेशन लिमिटेड यांच्यावतीने बांधण्यात येणार आहे. याकामाला एकूण २०१ कोटीचा खर्च अपेक्षित असून त्याला संचालक मंडळाने मंजुरी प्रदान केली आहे. लवकरच या कामासाठी निविदा काढण्याचे काम सुरू होणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.रामनाथ सोनवणे यांनी दिली.

### अंबाझरी उद्यानात विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी शहरात प्रत्येक झोनमध्ये एक विरंगुळा केंद्र तयार करण्यात येत आहे. शनिवारी (ता.२१) धरमपेठ झोनमध्ये बांधण्यात येणाऱ्या विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन अंबाझरी उद्यानात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, विरंगुळा केंद्र ही एक अतिशय सुंदर संकल्पना आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात समवयस्क व्यक्तींनी एकत्र येऊन आनंदाचे काही क्षण घालवावे. पुस्तके वाचावी. गाणी म्हणावी, इनडोअर खेळ खेळावे ही कल्पनाच आनंद देऊन जाणारी आहे. आता प्रत्येक झोनमध्ये असे विरंगुळा केंद्र उभारून ज्येष्ठ नागरिकांसाठी हक्काचे स्थान निर्माण करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला परिसरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### व्हाईस ऑफ विदर्भ'च्या अंतिम फेरीसाठी २३ कलावंतांची निवड

**मनपा–लकी म्यूझिकल इवेंट्‌सचे आयोजन : ४ ऑगस्टला होणार 'मेगा फायनल'**

नागपूर महानगरपालिका आणि लकी म्यूझिकल इवेंट्‌सच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'व्हाइस ऑफ विदर्भ'च्या अंतिम फेरीसाठी दोन्ही गटातून २३ स्पर्धकांची निवड आज करण्यात आली. ४ ऑगस्ट रोजी कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित कार्यक्रमात विजेत्याची निवड करण्यात येईल.

**विजयी स्पर्धक :**

१४ वर्षावरील गट : प्राची वैद्य, स्वास्तिका ठाकूर, उजमा शेख, श्रीकांत टकले, वैष्णवी निम्बुलकर, गौरव हजारे, पौर्णिमा, श्रेया मेंढे, विजय खडसे, प्रज्योत देशमुख, स्नेहल चव्हाण, शशांक मोरेकर, जगदीश डोंगरे. १४ वर्षाखालील गट : ज्ञाननंदा भोंडे, सुमिधा बालपांडे, आयुष मानकर, सिया जेम्स, स्वप्नमय चौधरी, मिताली कोहड़, विश पारलकर, सानवी पाठक, श्रावणी खंडाले, मुकुंद कुथे.

**४ ऑगस्टला 'फायनल'**

'व्हाईस ऑफ विदर्भ'ची अंतिम फेरी ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. ह्या स्पर्धेसाठी श्रोत्याना प्रवेश निःशुल्क राहील.

# कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प देशासाठी पथदर्शी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



## शहरातील प्रमुख विकास कामांचे डीजिटल भूमिपूजन व लोकार्पण

नागपूर शहरातील संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया होऊन त्यातून वीज निर्मिती होणार आहे. त्यामुळे भांडेवाडीत साचणारा कचरा यापुढे साचणार नाही. मोठी जागा तेथे रिक्त होईल. बायोमायनिंगच्या माध्यमातून तेथे उद्यान व अन्य प्रकल्प साकारले जातील. मनपाच्या उत्पन्नात यामुळे भर पडणार आहे. आजचे युग 'इनोव्हेशन'चे आहे. पारंपरिक पद्धतीने काहीच शक्य नाही. काहीतरी इनोव्हेटिव्ह केले तर पुढील पाच वर्षात नागरिकांचे आयुष्य बदलून जाईल. नागपुरातील कचऱ्यापासून वीज निर्मिती हा 'इनोव्हेशन'चा भाग असून हा प्रकल्प देशासाठी पथदर्शी ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.सोमवारी (ता. १६) रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात नागपूर महानगरपालिकेतर्फे आयोजित विविध विकास कामांच्या डिजीटल भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय भूपृष्ठ परिवहन महामार्ग आणि जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रेल्वे व कोळसा मंत्री पीयूष गोयल, राज्याचे ऊर्जा मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते कोळसा पाईप कन्व्हेयर प्रकल्प, भानेगाव सांडपाणी वापर प्रकल्प, भांडेवाडी येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प या कामांचे डिजिटल भूमिपूजन करण्यात आले. शिवाय मान्यवरांच्या उपस्थितीत मेट्रो, महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षरीही करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, नागपूर–मुंबई समृद्धी मार्गावर सुपर एक्स्प्रेस कम्युनिकेशन रेल्वे असावी, ही केंद्रीय रेल्वे मंत्री पीयूष गोयल यांची संकल्पना स्वागतार्ह आहे. तसे व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रकल्प अहवाल तयार केला होता. मात्र आर्थिक अडचणीमुळे त्यावर विचार झाला नाही. आता रेल्वे मंत्र्यांनीच त्याला हिरवी झेंडी दाखविल्याने नागपूर–मुंबई अंतर पाच तासांत कापण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, आजचे युग 'इनोव्हेशन'चे युग आहे. 'इनोव्हेशन'च्या युगात तंत्रज्ञानाची जोड देऊन विकसीत उपक्रमांद्वारेच लोकांच्या जीवनात क्रांतिकारक परिवर्तन करता येऊ शकते. नागपुरातही अशीच विकास कामे साकारत असून ही विकास कामे संपूर्ण राज्यच नव्हे तर देशासाठी आदर्श उदाहरण ठरेल. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी वाहने खरेदी करणे बंद करा, पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करा, सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग करा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## नागपुरातील कामांची गतीशीलता देशासाठी आदर्श : पीयूष गोयल

नागपुरात सुरू असेलेली विद्युत कामांमधील गतीशीलता संपूर्ण देशासाठी आदर्श आहे, अशा शब्दांमध्ये केंद्रीय रेल्वे व कोळसा मंत्री पीयूष गोयल यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचा गौरव केला. नागपुरातील विद्युतीकरणाच्या कामांचे उदाहरण पाहता केंद्र सरकार संपूर्ण रेल्वेच्याही विद्युतीकरणासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे येत्या काळात सुमारे १२ ते १५ हजार कोटी रुपये वाचणार आहेत, असेही केंद्रीय मंत्री गोयल म्हणाले.

# स्मार्ट सिटीसाठी जर्मनीच्या कार्ल्सरु शहराचे नागपूरला सहकार्य

## उपमहापौर दीपराज पार्डीकर यांच्या नेतृत्वात दोन शहरात करार




स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत नागपूर शहरात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांना आता जर्मनीतील कार्ल्सरु शहराचे सहकार्य मिळणार आहे. या संबंधी कार्ल्सरु व नागपूर महानगरपालिका यांच्यात जर्मनीमध्ये एका करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. नुकतेच उपमहापौर दीपराज पार्डीकर यांच्या नेतृत्वात नागपूर महानगरपालिकेच्या एका शिष्टमंडळाने जर्मनीतील कार्ल्सरु शहराला भेट दिली. या भेटीत हा करार करण्यात आला. या शिष्टमंडळात नागपूर महानगरपालिकेतर्फे उपमहापौर दीपराज पार्डीकर यांच्यासह नागपूर स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलमपेंट कॉर्पोरेशन लि.चे संचालक मंडळातील नामनिर्देशित सदस्य तसेच बसपा गटनेते मोहम्मद जमाल, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर, महाव्यवस्थापक राजेश दुफारे हे सहभागी झाले होते. शिष्टमंडळाने ११ ते १८ जुलै दरम्यान कार्ल्सरु शहराचा दौरा केला. यावेळी शिष्टमंडळाने कार्ल्सरु शहरातील विविध कामांची पाहणी केली तसेच स्मार्ट सिटीवरील परिषदांमध्ये सहभाग घेतला. यावेळी महाव्यवस्थापक राजेश दुफारे यांनी नागपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापन या विषयावर सादरीकरण केले. कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर यांनी स्मार्ट सिटीसंदर्भात सादरीकरण केले. नागपूर आणि कार्ल्सरु यांच्यातील करार हा संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी महत्त्वकांक्षी व प्रभावी ठरणार आहे. नागरी प्रश्नांवर दोन शहरांमध्ये चर्चा होईल. त्यामुळे जागतिक स्तरावर सहकार्याची भावना विकसित होईल, असा विश्वास कार्ल्सरु शहराचे इनोव्हेशन युनियनचे प्रमुख आर. इचहॉन यांनी व्यक्त केला. कार्ल्सरु शहरातील विकास कामांच्या गतीशिलतेने आपल्याला प्रभावित केले असून या करारामुळे इंटरनॅशनल अर्बन को–ऑपरेशन इंडिया प्रकल्पांतर्गत दोन शहरांमध्ये तंत्रज्ञानाची आदान–प्रदान होईल, असा विश्वास करारादरम्यान उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी व्यक्त केला.

# 'दुर्धर आजार' रुग्णांसाठी आता आपली बसचे मोफत स्मार्ट कार्ड

## मनपाच्या परिवहन समितीची मंजुरी : महिन्याभरात सहा वेळा करता येईल प्रवास



नागपूर शहरातील 'दुर्धर आजार' म्हणून गणल्या जाणाऱ्या आजाराच्या रुग्णांसाठी नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे मोफत प्रवासासाठी 'स्मार्ट कार्ड' वितरीत करण्यात येणार आहे. या विषयाला सोमवारी (ता. २३) परिवहन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.नागपूर महानगर पालिका मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात आज (ता. २३) परिवहन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत दुर्धर आजार असलेल्यांना स्मार्ट कार्ड वितरीत करण्यासंदर्भातील विषय चर्चेला आला. ए.आर.टी. औषधे घेण्याकरिता ए.आर.टी. केंद्रात येणाऱ्या व्यक्तींना पैशाअभावी त्यांच्या औषधीत खंड पडू नये या मानवीय दृष्टिकोनातून मनपाद्वारे संचालित रेड शहर बस वाहतुकीच्या मोफत पास उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित असल्याचे परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप यांनी सांगितले. या प्रस्तावानुसार सर्व लाभार्थ्यांना एक मोफत स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येईल. लाभार्थ्यांना त्यांच्या राहत्या घरापासून ए.आर.टी. केंद्राकरिता महिन्यातून सहा वेळा मोफत प्रवासाची मुभा या स्मार्ट कार्ड अंतर्गत राहील. अर्थात ही मुभा नागपूर शहर आणि जिल्ह्यात ज्या हद्दीपर्यंत शहर बस सुरू आहे, तिथपर्यंत राहील. या पास धारकांना उपलब्ध असलेल्या वेळापत्रकानुसारच बसेसचा वापर करण्याची परवानगी राहील. कुठलीही अतिरिक्त किंवा जादा फेरी सोडणे बंधनकारक राहणार नाही. या स्मार्ट कार्ड अंतर्गत एका वर्षातील १२ महिन्यांमध्ये प्रवास करण्याची मुभा राहील. या पासचे दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल, अशी माहिती परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप यांनी दिली. या प्रस्तावाला सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी व समिती सदस्यांनी मंजुरी दिली.



# महिला सक्षमीकरणासाठी एकीची हाक मनपा समाजकल्याण विभागाचे 'चलो चले प्रगति की ओर' अभियान

## मंगळवारी झोनमधील कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

आजच्या आधुनिक युगात महिला पुरूषांच्या बरोबरीने वाटचाल करीत आहेत. प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या महिलांमध्ये गृहिणींचे योगदान महत्वपूर्ण आहे. घराची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी, समाजात सन्मानाचे स्थान मिळविण्यासाठी आता एकत्र येणे गरजेचे असे सांगत नागपूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती प्रगती पाटील यांनी एकीची हाक दिली.नागपूर महानगरपालिका समाजकल्याण विभाग तसेच महिला व बालकल्याण समितीच्या वतीने गुरूवारी (ता. १९) मंगळवारी झोनमधील महिला बचत गटांच्या सदस्यांकरिता 'चलो चले प्रगति की ओर' अभियानांतर्गत छावनी येथील दुर्गा माँ प्रार्थना भवन येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रगती पाटील बोलत होत्या. शहरी महिला बचत गटातील महिलांना लघुउद्योगाचे धडे देत त्यांना सक्षम बनविण्याच्या उद्देशाने या अभियाला सुरूवात करण्यात आली. पुढे बोलताना सभापती प्रगती पाटील म्हणाल्या, उत्तमपणे कुटुंबाचा भार वाहणाऱ्या महिलांमध्ये व्यवस्थापनाचे उत्तम कौशल्य असते. लघु उद्योग हा स्त्रीच्या उन्नतीचा मार्ग आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून त्या व्यवसायात योग्य भरारी घेऊ शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांच्या उत्थानासाठी शासनाकडून अनेक योजना राबविल्या जात आहेत. या योजनांची पूरेपूर माहिती घेउन त्याच्या अंमलबजावणीसाठी कशी करावी, शिवाय बँकांकडून आर्थिक सहकार्य कसे मिळविता येईल याची माहिती एकत्रितरित्या मिळावी, यासाठी प्रत्येक झोनमध्ये अभियानाची ओळख करून देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. स्वयं सक्षमीकरणासाठी महिलांनी पुढाकार घेत अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती प्रगती पाटील यांनी यावेळी केले.

# 'सिटी ऑपरेशन सेंटर' मधून मुख्यमंत्र्यांनी केली पूरपरिस्थितीची पाहणी



## मनपाला आकस्मिक भेट : नागरिकांना सर्व मदत करण्याचे प्रशासनाला निर्देश

नागपूर शहरात गुरुवारी रात्रीपासून सुरु असलेल्या पावसाने संपूर्ण शहरात पाणी साचले आहे. अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले आहे. नाग नदी, पिवळी नदी, पोहरा नदी दुथडी भरून वाहत आहे. शहरातील या संपूर्ण परिस्थितीची माहिती घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमातीत असलेल्या 'सिटी ऑपरेशन सेंटर'ला भेट देऊन परिस्थितीची संपूर्ण माहिती घेतली. जेथे आवश्यक आहे, त्या सर्व ठिकाणी तातडीने मदत पोहोचवावी, आपत्ती व्यवस्थापानाचे कार्य चोखपणे बजावण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले. यावेळी महापौर नंदा जिचकार त्यांच्या समवेत होत्या. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी पावसामुळे झालेल्या नागपूर शहराच्या परिस्थितीची माहिती घेतली. नागपूर शहरात लागलेल्या तीन हजारांवर कॅमेऱ्याच्या माध्यमातून संपूर्ण शहरातील परिस्थितीची माहिती सिटी ऑपरेशन सेंटरला मिळत असते. विमानतळ, हॉटेल प्राईडसमोरील परिसर, पोहरा नदीमुळे सोनेगाव पोलिस ठाणा परिसरात आणि वर्धा रोडवरील घरांत शिरलेले पाणी, पडोळे चौक, पारडी चौक, ऑटोमोटिव्ह चौक आदी ठिकाणची त्यांनी माहिती घेतली. अतिवृष्टीमुळे शहरातील परिस्थिती गंभीर असून संपूर्ण यंत्रणा २४ तास कर्तव्यावर ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. नदीकाठावर असलेल्या नागरिकांना धोक्याची सूचना देऊन तातडीने हलविण्याचे निर्देश त्यांनी दिली. शाळा, समाजभवन तयार ठेवा. सर्व ती मदत आणि सहकार्य करा, असेही निर्देश त्यांनी दिले. आपतकालिन यंत्रणा संपूर्ण शहरात मदत कार्य करीत असून जेथून नागरिकांची मागणी आली तेथे तातडीने मदत पाठविली जात असल्याची माहिती मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली.

# थोडक्यात...



## महानगरपालिका व आयसीएलईआय-एसए मध्ये सामंजस्य करार

### हवामान बदल नियंत्रणासाठी निम्न उत्सर्जन विकास प्रणालीद्वारे मिळणार गती

नागपूर महानगरपालिका व आयसीएलईआय-दक्षिण आशिया यांच्यात नुकताच हवामान प्रक्रियेत गती आणण्यासाठी शहरी निम्न उर्त्सजन विकास प्रणाली (अर्बन लो एमिशन डेव्हलपमेंट स्ट्रॅटेजी)च्या अंमलबजावणीसंबंधी सामंजस्य करार करण्यात आला. आयसीएलईआय-दक्षिण आशिया व यून हॅबिटेट द्वारे युरोपियन कमिशनच्या सहकार्याने या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सामंजस्य कराराच्या स्वाक्षरी समारंभात महापौर नंदा जिचकार, आयुक्त वीरेंद्र सिंह प्रामुख्याने उपस्थित होते.शहरातील कमी उत्सर्जन विकास (एलईडी) प्रणालीला प्रोत्साहन देत हरीतगृह वायू (जीएचजी) उत्सर्जन कमी करणे हा अर्बन एलईडीएस प्रणालीचा मुख्य उद्देश आहे. युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज (यूएनएफसीसीसी) अंतर्गत पॅरीस कराराशी हा प्रकल्प संलग्नीत आहे. महापालिका क्षेत्रातील पाणी, दुषीत पाणी, घनकचरा व्यवस्थापन, उर्जा, वाहतूक व नगर रचना यासह सर्व विभागातील उर्जेचा वापर कमी करून त्यातून उत्सर्जीत होणारा हरीतगृह वायू (जीएचजी)चे प्रमाण कमी करण्याचा प्रकल्पाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे हवामान बदलाची पुर्वतयारी करता येईल. शहरातील प्रभावित क्षेत्र लक्षात घेउन त्याद्वारा कृती आराखडा तयार करण्यात येईल. प्रकल्पामध्ये आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा समावेश असून आधी एका ठराविक ठिकाणी प्रकल्पाची चाचणी घेउन त्यानंतर संपूर्ण शहरात ते लागू करण्यात येईल.

## शेषनगर ते गांधीबाग बससेवेचा शुभारंभ

### आमदार सुधाकर कोहळे यांनी दाखवली हिरवी झेंडी



नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागामार्फत आपली बस या योजनेअंतर्गत शहरातील विविध भागात सार्वजनिक बस सेवा सुरू करण्यात आली आहे. रविवारी (ता.८) रोजी शेषनगर ते गांधीबाग बससेवेचा शुभारंभ दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी नगरसेवक राजेंद्र सोनकुसरे, नागेश मानकर, नगरसेविका मंगला खेकरे, माधुरी ठाकरे, मुकुंद डगवार, दामोदर बोबडे, प्रमोद सारंगे, वसंत गणोरकर, नानाभाऊ आदेवार, शुभांगी घ्यार, सुधीर सोनटक्के, रामराव मातकर प्रामुख्याने उपस्थित होते. शेषनगर ते गांधीबाग ही बस सेवा सुरू करण्यासाठी नागरिकांची वारंवार मागणी येत होती. त्यावर परिवहन समिती बंटी कुकडे आणि परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप यांनी पुढाकार घेऊन ही बस सेवा सुरू केली. ही बस शेषनगरहून सकाळी ९.२० ला सुटेल तर शेवटची बस दुपारी ४.५० ला सुटेल. गांधीबागहून ही बस सकाळी १०.२० ला सुटेल तर शेवटची बस ५.४० ला सुटेल. ही बस तपस्या शाळा, मानेवाडा चौक, क्रीडा चौक, आयचित मंदिर मार्गे गांधीबाग धावेल. या मार्गाचे पूर्ण तिकीट १३ रूपये आहे तर अर्धे तिकीट सात रूपये आहे. ही बस सेवा सुरू झाल्यामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

## अधीक्षक अभियंता संजय गायकवाड, निगम अधीक्षक राजन काळे यांच्यासह ४५ कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती सत्कार



नागपूर महानगरपालिकेचे अधीक्षक अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, उपअभियंता (नद्या व सरोवरे) मोहम्मद इजराईल आणि निगम अधीक्षक राजन काळे या अधिकाऱ्यांसह आज ४५ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीबद्दल महापालिका प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर महानगरपालिकेत विविध विभागात कार्यरत ४५ अधिकारी-कर्मचारी आज (ता. ३१) सेवानिवृत्त झाले. त्यांचा शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे, स्मृतिचिन्ह व धनादेश देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धामेचा, निगम अधीक्षक मदन सुभेदार, मनपा कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुरेंद्र टिंगणे, कार्याध्यक्ष विलास चहांदे, कर्मचारी नेते राजेश हाथीबेड, डी.जी. भडंग, बाजार अधीक्षक श्रीकांत वैद्य, सहायक अधीक्षक दत्तात्रय डहाके, सहायक अधीक्षक (साप्रवि) मनोज कर्णिक, उपअभियंता दीपक चिटणीस यावेळी उपस्थित होते. सेवानिवृत्त अधिकारी अधीक्षक अभियंता संजय गायकवाड, उपअभियंता मोहम्मद इजराईल, निगम अधीक्षक राजन काळे, ज्येष्ठ लिपिक मो. अन्सारी, राजस्व निरीक्षक श्रीमती एस. देशकर, डी. एस. गाडगीळ, श्रीमती एम. के. केसवानी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले. आभार सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस यांनी मानले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्वासाठी सर्वांनी सहकार्य करावे

### महापौर नंदा जिचकार यांचे भावनिक आवाहन



गणेशोत्सवात वाढत्या प्रदुषणामुळे शहरातील पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. पीओपीच्या गणेशमूर्त्या तसेच निर्माल्यामुळे शहरातील तलावांचे आरोग्य बिघडते. यासाठी मनपाने मागील वर्षी पुढाकार घेत कृत्रिम तलाव निर्माण केले होते. त्याला नागपुरकर जनतेने उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळे शहरातील गांधीसागर, सक्करदरा, सोनेगाव या प्रमुख तलावांमध्ये एकही गणेश मूर्ती विसर्जीत करण्यात आली नाही. त्यामुळे या तलावांचे सौंदर्यही कायम आहे. मात्र शहरातील चौपाटी अशी ओळख असलेल्या फुटाळा तलावातील विसर्जित होणाऱ्या मूर्त्यांची कमी होउ शकली नाही. त्यामुळे तलावाचे आरोग्य धोक्यात आहे. शहरातील ओळख असलेल्या फुटाळा तलावाचे सौंदर्य अबाधित राहण्यासाठी यावर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सावासाठी सर्वांनी सहकार्य करा. नागपूर महानगरपालिका सदैव आपल्या सोबत आहे, असे भावनिक आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले.पर्यावरणपूरक गणेशोत्सवासंबंधी नव्या संकल्पना आमंत्रित करण्याबाबत बुधवारी राजे रघुजी भोसले नेताजी नगर भवन येथे शहरातील मोठे गणेश मंडळ, सामाजिक संस्थांसह प्रत्येक झोनच्या सभापतींची महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीत महापौर श्रीमती जिचकार बोलत होत्या. महापौर श्रीमती जिचकार पुढे म्हणाल्या, मागील वर्षी गणेशोत्सवात गणेश मंडळ व शहरावासीयांच्या सहकार्यामुळे सुमारे दोन लाख गणेश मुर्त्यांचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले. मात्र मोठ्या मुर्त्यांचे फुटाळ्यात होणारे विसर्जन पर्यायी व्यवस्था नसल्याने रोखू शकता आले नाही. आपले नागपूर स्मार्ट शहर होत असताना बदलत्या शहरासह लोकांची मानसिकताही बदलविणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी आपण आणखी काय चांगले करू शकतो, हे सुचविण्यासाठी आपल्याकडील नव्या संकल्पनांचे स्वागत आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी सभागृहात गणेश मंडळाच्या सदस्यांनी पितळेच्या गणेश मुर्ती स्थापन करण्याची संकल्पना मांडली. याला महापौरांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शवित पितळेच्या मुर्त्यांसाठी सर्वांनी पुढाकार घेतल्यास या मुर्त्या कर मुक्त करू असे जाहीर केले. पर्यावरणपूरक गणेशोत्वाबाबत जागरुकता निर्माण व्हावी यासाठी स्पर्धा घेण्यात येणार आहे. पर्यावणाला बाधा न पोहोचविता उत्तम संदेश देत गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांना पुरस्कारही देण्यात येणार असल्याचे महापौर श्रीमती जिचकार यांनी यावेळी सांगितले.

## एक खिडकी योजनेतील विलंब कमी होणार

गणेशोत्सवासाठी मंडळांना घ्याव्या लागणाऱ्या परवानगीसाठी महानगपालिकेने झोन स्तरावर एक खिडकी योजना लागू केली. मात्र या योजनेमुळे परवानगीसाठी बराच विलंब होत असल्याची तक्रार यावेळी काही गणेश मंडळांच्या सभासदांनी केली. यावर महापौरांनी एक खिडकी योजना प्रभावीपणे राबवून यामध्ये होणारा विलंब कमी करण्यासाठी पुरेपुर प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.



## मनपा तर्फे ९ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट दरम्यान महापौर चषक वंदे मातरम् समूहगान स्पर्धा

नागपूर महानगरपालिकेतर्फे ९ ते १४ ऑगस्ट दरम्यान महापौर चषक 'वंदे मातरम्' समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे यांनी दिली. सोमवारी (ता.२३) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात शिक्षण समितीची बैठक आयोजित करण्यात आली.यावेळी समितीच्या उपसभापती भारती बुंदे, सदस्य राजेंद्र सोनकुसरे, रिता मुळे, प्रमिला मंथरानी, मो.ईब्राहिम तौफिक अहमद, उपायुक्त रवींद्र देवतळे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, क्रीडा निरिक्षक नरेश चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते. दरवर्षी प्रमाणे यंदाही महापालिकेद्वारे ९ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट महापौर चषक वंदे मातरम् समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. ही स्पर्धा तीन गटात आयोजित करण्यात आली असून वर्ग ९ ते १० गट क्रमांक १, वर्ग ६ ते ८ गट क्रमांक २, वर्ग १ ते ५ गट क्रमांक ३ या प्रकारे गटरचना केली आहे. ९ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट दरम्यान सीताबर्डी येथील विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात स्पर्धेची प्राथमिक फेरी आयोजित करण्यात आली आहे. १४ ऑगस्टला स्पर्धेची अंतिम फेरी कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आली असल्याची माहिती क्रीडा निरिक्षक नरेश चौधरी यांनी दिली. या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात यावे, असे निर्देश सभापती दिलीप दिवे यांनी दिले. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये बायोमॅट्रिक मशीन्स लावण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली. याबाबत निविदा प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर असल्याची माहिती शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी दिली. महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटर देण्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून १८ सप्टेंबरपर्यंत स्वेटर सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना देण्याचे निर्देश सभापती दिलीप दिवे यांनी दिले. स्वेटरचा नमुना रंग व आकार तपासण्यासाठी साहित्य निवड स्वीकृती समितीकडे पाठविण्यात आला आहे. पुढील तीन दिवसात समितीचा अहवाल आल्यानंतरच स्वेटरबाबतचा निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी दिली. स्वेटरचा नमुना शिक्षण समितीपुढे सादर करण्यात यावा, असे निर्देश समिती सभापती दिलीप दिवे यांनी दिले. मनपाच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यासाठी अक्षय पात्र ही योजना मनपाच्या सर्व शाळांमध्ये लागू करण्यात आल्याची माहिती सभापती दिलीप दिवे यांनी दिले. मनपाच्या सर्व शाळेमध्ये झोननिहाय झालेल्या पटनोंदणीबाबत आढावा यावेळी सभापतींनी घेतला. मनपाच्या सर्व शाळांमध्ये वृक्षारोपण करण्याचे निर्देशही सभापती दिलीप दिवे यांनी दिले.

## बुटी दवाखान्याचा होणार कायापालट!

### सभापती संजय बंगाले : ३० खाटांच्या रुग्णालयासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश

सीताबर्डी येथील १३० वर्षे जुनी बुटी दवाखान्याची इमारत आणि त्याच्या बाजूला असलेल्या खुल्या जागेवर राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या माध्यमातून कम्युनिटी हेल्थ सेंटर आणि ३० खाटांच्या रुग्णालयाचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले यांनी दिले.शहरातील काही प्रलंबित प्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने बुधवारी (ता. ११) मनपा मुख्यालयाच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात स्थापत्य व प्रकल्प समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.बुटी दवाखाना हा मुख्य व्यापारी क्षेत्रात असल्याने त्याचे नूतनीकरण करून अथवा नव्याने एनयूएचएमच्या माध्यमातून मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पीटल बांधण्याच्या दृष्टीने बैठकीत विषय चर्चेला आला. मात्र, एनएचयूएमच्या अंतर्गत मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पीटलचे प्रावधान नसल्याची माहिती आरोग्य अधिकारी डॉ. अनिल चिव्हाणे यांनी दिली. चर्चेअंती या जागेची मालकी, त्यासंदर्भातील दस्तावेज १० दिवसांत एकत्रित करून आरोग्य अधिकाऱ्यांकडे सोपवावा. त्याच्या उपलब्धतेनंतर आरोग्य अधिकाऱ्या ३० खाटांच्या रुग्णालयाचा प्रस्ताव तयार करावा आणि एनयूएचएमकडे पाठवावा, असे निर्देश सभापती संजय बंगाले यांनी दिले.

### त्या' इमारतीतील अतिक्रमण हटवा, अन्यथा कारवाई!

धरमपेठ झोनअंतर्गत येणाऱ्या धंतोली परिसरातील सार्वजनिक वापराच्या जागेवर असलेल्या अतिक्रमणाच्या कारवाईत होणाऱ्या दिरंगाईवरही सभापती संजय बंगाले यांनी नाराजी व्यक्त केली. सदर अतिक्रमणासंदर्भातील याचिका न्यायालयाने खारीज केली. यासंदर्भातील फाईल अतिक्रमण विभागाकडे १२ जून रोजी पाठविण्यात आली. एक महिन्याचा कालावधी उलटूनही कारवाई का झाली नाही, याबाबत सभापतींनी अधिकाऱ्यांना विचारणा केली. पुढील १० दिवसांत जर कारवाई झाली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांवरच कारवाईचे निर्देश देण्यात येईल, असा इशारा सभापती संजय बंगाले यांनी दिला.

## नागपूरला करणार सांस्कृतिक चळवळीचे केंद्र

### मनपा क्रीडा सभापती नागेश सहारे यांचा संकल्प : वर्षभर करणार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

नागपूर महानगरपालिका नागरिकांना सेवा देण्यासोबतच शहरातील क्रीडा आणि सांस्कृतिक वातावरण निर्मितीसाठी कटिबद्ध आहे. स्थानिक खेळाडूंना आणि कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न मनपाच्या क्रीडा आणि सांस्कृतिक समितीतर्फे करण्यात येणार आहे. भविष्यात नागपूर शहर सांस्कृतिक चळवळीचे केंद्र व्हावे आणि सांस्कृतिक शहर म्हणून नावारूपास यावे या दृष्टीने कार्य करणार असल्याचा संकल्प मनपाचे क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे यांनी केला आहे.यासंदर्भात बोलताना ते म्हणाले, नागपूर महानगरपालिका ही केवळ नागरिकांना सेवा देते ह्या ओळखीसोबतच स्थानिक खेळाडू, कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी महानगरपालिका अशी नवी ओळख निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागपुरात अनेक कलावंत आहे. गरीब कुटुंबातील अनेक कलावंत व्यासपीठाअभावी समोर जाऊ शकत नाही. प्रत्येक कलावंताला पुणे-मुंबईला जाता येत नाही. या कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आता मनपा पुढाकार घेत आहे. मागील वर्षी खेळाडूंसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी क्रीडा स्पर्धांसोबतच सांस्कृतिक स्पर्धांचीही रेलचेल राहणार आहे. नृत्य, गायन, अभिनय क्षेत्रातील कलावंतांना समोर जावे यासाठी विविध स्पर्धांसोबतच प्रशिक्षण शिबिराचेही आयोजन करण्यात येईल. या क्षेत्रातील दिग्गज मंडळीकडून प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात येईल. एकंदरच वर्षभरात नागपुरात सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्याचा मनपाचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. हे करीत असतानाच सांस्कृतिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचाही मनपाचा प्रयत्न राहील. यासाठी नागपूरकरांचीही साथ आवश्यक आहे. यामध्ये ज्या कोणाला योगदान द्यावयाचे आहे, त्यांनी मनपाच्या क्रीडा समितीशी संपर्क साधण्याचे आवाहन क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी केले आहे.

## पणजी महानगरपालिकेला द्या ग्रीन बसची माहिती

### गोवा विधानसभा अध्यक्ष प्रमोद सावंत यांचे नागपूर मनपाला निमंत्रण छत्रपती ते विधानभवन पर्यंत केला ग्रीन बसने प्रवास

स्मार्ट नागपूरची सार्वजनिक वाहतूकही स्मार्ट आहे. पणजी शहरातही अशाप्रकारची वाहतूक व्यवस्था तयार झाल्यास रस्त्यांवरील इतर वाहनांचा भार कमी होईल. नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने येथील 'ग्रीन बस'चे सादरीकरण पणजी महानगरपालिकेच्या पदाधिकारी आणि सदस्यांसमोर करावे, असे निमंत्रण गोवा विधानसभेचे अध्यक्ष प्रमोद सावंत यांनी परिवहन समितीचे सभापती बंटी कुकडे यांना दिले.नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शहरात परिवहन विभागाच्या संचालित ग्रीन बसमधून गुरुवारी (ता. १२) गोवा विधानसभेचे अध्यक्ष प्रमोद सावंत यांनी छत्रपती चौक ते विधान भवन असा प्रवास केला. या प्रवासादरम्यान त्यांनी सदर निमंत्रण दिले. ग्रीन बसच्या या प्रवासात उत्तर प्रदेशच्या बस्ती जिल्ह्यातील आमदार संजयप्रताप जयस्वाल, परिवहन समितीचे सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे, नागपूर शहर उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष अजय पाठक, भाजप अनुसूचिजत जाती मोर्चाचे महामंत्री मनीष मेश्राम, भाजपचे तेजप्रताप सिंग, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, परिवहन विभागाचे प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे आदी उपस्थित होते. प्रारंभी परिवहन सभापती बंटी कुकडे यांनी गोवा विधानसभा अध्यक्ष प्रमोद सावंत आणि आमदार संजयप्रताप जयस्वाल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर बस प्रवासादरम्यान सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी ग्रीन बस आणि मनपाच्या परिवहन विभागांतर्गत संचालित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची माहिती दिली. नागपूर शहरात सुरू असलेल्या ग्रीन बस इथेनॉलवर चालत असून ग्रीन बस आणि आपली बस शहरात दररोज ८४ हजार कि.मी.चा प्रवास करतात. सुमारे दोन हजार चालक आणि दोन हजार वाहकांना यामुळे रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक टॅक्सी, बॅटरीवर चालणारे ई-रिक्षानंतर आता इलेक्ट्रिक बसचा प्रयोगही नागपुरात होऊ घातला आहे. भविष्यात नागपुरात येणाऱ्या सर्व खासगी बसेस शहराच्या बाहेर थांबविण्यात येतील. तेथून शहरात येण्यासाठी ग्रीन बस आणि आपली बस सेवा देतील. यामुळे उत्पन्नात भर पडेल, अशी माहिती श्री. कुकडे यांनी दिली. नागपूर महानगरपालिकेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या ग्रीन बस आणि वाहतूक व्यवस्थेची प्रशंसा करीत विधानसभा अध्यक्ष प्रमोद सावंत यांनी अशी वाहतूक व्यवस्था सर्वच शहरात असेल तर प्रदूषण कमी होण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल, असे म्हटले. वॉटस् प तक्रार क्रमांक, टोल फ्री क्रमांक, येणाऱ्या तक्रारींचे केलेले निरसन ह्या सर्वच बाबी प्रशंसनीय आहेत. पणजीमध्येही अशी व्यवस्था व्हावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

# समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा : महापौर नंदा जिचकार

### मनपा व दृष्टी - स्पर्श आर्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन



आपले व्यक्तिमत्व घडत असताना आपले पालक, मित्र मंडळी, नातेवाईक यांचा जेवढा हातभार असतो तेवढाच हातभार समाजाचा देखिल असतो. त्याच समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले. नागपूर महानगरपालिका, दृष्टी - स्पर्श आर्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र आणि सक्षम यांच्या सहकार्याने सुप्रसिद्ध चित्रकार चिंतामणी हसबनीस यांच्या चित्रांच्या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा शनिवारी (ता.१४) रोजी दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र येथे आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर उत्तर नागपूरचे आमदार डॉ.मिलिंद माने, सक्षमचे विदर्भ प्रांत अध्यक्ष सुधाकर इंगोले, सक्षम नागपूरचे अध्यक्ष उमेश अंधारे, दक्षिण मध्य सांस्कृतिक क्षेत्राचे संचालक दीपक खिरवडकर प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, अतिशय स्त्युत्य असे प्रदर्शन मी माझ्या आयुष्यात प्रथमच अनुभवत आहे. या सर्व चित्रांमधून कलाकाराची प्रतिभा दिसून येत आहे. ही चित्रे दृष्टीहीन मित्रांनाही अनुभवता येत आहे. चित्राला स्पर्श करून दृष्टीहीन मित्रांना ब्रेल लिपीच्या साह्याने ही चित्र ओळखता येतात. याशिवाय डोळसांसाठी चित्रांच्या सौंदर्यात भरही पडते, असेही महापौर नंदा जिचकार यांनी प्रतिपादित केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक चित्रकार चिंतामणी हसबनीस यांनी केले. या चित्र प्रदर्शनामागील पार्श्वभूमी त्यांनी विषद केली. त्यांनी साकारलेल्या एका ब्रेल पेन्टींगचे मान्यवरांच्या हस्ते विधीवत उद्घाटन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या प्रदर्शनात सुप्रसिद्ध नट अभिताभ बच्चन यांची ब्लॅक चित्रपटातील भूमिका साकारलेले चित्र, सुप्रसिद्ध नट दिलीप प्रभावळकर यांच्या आवडत्या दहा व्यक्तीरेखा पेंटीगच्या माध्यमातून साकारण्यात आल्या आहेत. याशिवाय रस्ता सहज ओलांडणारी दृष्टीहीन मुलगी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर, कोरलेला प्राचीन शिलालेख, निसर्गचित्र, ललितकला मांडणारी चित्रे या प्रदर्शनात मांडलेली आहे. या प्रदर्शनासाठी नागपूर शहरातील व जिल्ह्यातील सर्व अंध शाळेतील विद्यार्थ्यांना ने आण करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या बसेसची सोय करण्यात आली आहे. हे चित्रप्रदर्शन अर्थपूर्ण आणि मनमोकळा संवाद साधणारी पर्वणीच नागपूरकरांसाठी आहे. या प्रदर्शनाला जास्तीत जास्त संख्येने भेट द्यावी, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी आयोजकांच्या वतीने केले आहे.